पुढारी
www.pudhari.com



आजरा : 'रवळनाथ'च्या सदिच्छा भेटीप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र हिरेमठ. शेजारी संचालक प्रा. विजय आरबोळे, प्रा. डॉ. दत्ता पाटील, सीईओ डी. के. मायदेव.

# 'रवळनाथ'च्या कामगिरीने भारावलो : डॉ. हिरेमठ

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

आजरा-गडहिंग्लजसारख्या ग्रामीण भागात सुरू झालेल्या श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीने निवारा चळवळीत मोलाचे योगदान दिले आहे. अवघ्या २५ वर्षांतील संस्थेच्या कामगिरीने आपण भारावून गेलो असून सहकाराच्या पडझडीच्या काळातील हे यशस्वी रवळनाथ मॉडेल सर्वदूर पोहोचवण्याची गरज आहे, असे गौरवोद्‌गार पुणे येथील जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी काढले.

मूळचे बसर्गे गावचे सुपुत्र राहिलेल्या डॉ. हिरेमठ यांनी गडहिंग्लज दौऱ्यात श्री रवळनाथ सोसायटीच्या येथील प्रधान कार्यालयास सदिच्छा भेट दिली. रवळनाथची सुसज्ज इमारत, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सामाजिक बांधिलकी आणि झेप ॲकॅडमी व इंटेंट करिअर फाऊंडेशनचे कार्य पाहून आपण भारावून गेलो असून लवकरच जनसेवा बँकेचे संचालक मंडळ आणि अधिकारी रवळनाथची कार्यपद्धती पाहण्यासाठी गडहिंग्लजला येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. अध्यक्षस्थानी संचालक प्रा. विजय आरबोळे होते.

यावेळी कल्पना हिरेमठ, नकाते यांच्यासह संचालक महेश मजती, मीना रिंगणे, रेखा पोतदार, ज्ञानदीप प्रबोधिनीचे सचिव संदीप कागवाडे, रवळनाथचे व्यवस्थापक शिवानंद घुगरे, वसुली अधिकारी सुनीलदत्त जाधव, आयटी विभागप्रमुख विजय बुगडे, शाखाधिकारी अशोक सुळकुडे, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, अकौंटंट सचिन चौगुले, झेपच्या अधीक्षक गौरी बेळगुद्री, केडीसीसी बँकेचे शिवकुमार जंगम आदींसह सभासद, कर्मचारी उपस्थित होते. संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक, प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. सीईओ दत्तात्रय मायदेव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Nov 28, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in